Estd.1962
NAAC 'A++' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक कं. 5

विषय : **शैक्षणिक वर्ष 2021–22 वर्षातील ऑक्टो./नोंव्हे. 2021 (हिवाळी सत्रातील) परीक्षेचे परीक्षा अर्ज भरण्याच्या सुधारित तारखेबाबत. (फक्त पारंपारिक अभ्यासक्रमासाठी)**

संदर्भ : 1. शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/704, दि. 29 ऑक्टो., 2021 चे पत्र.
2. शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/751, दि. 08 डिसेंबर 2021 चे पत्र.

शैक्षणिक वर्ष 2021–22 मधील ऑक्टो./नोंव्हे. 2021 च्या हिवाळी सत्रातील परीक्षेचे परीक्षा अर्ज स्विकारण्याच्या तारखा व परीक्षा शुल्काबाबतचे शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/704, दि. 29 ऑक्टो., 2021 चे परिपत्रक प्रसिध्द करण्यात आलेले आहे. पारंपारिक अभ्यासक्रमाच्या ( कला, वाणिज्य, विज्ञान, सर्व डिप्लोमा, सर्टिफिकेट, बी. व्होक, इतर ) विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज महाविद्यालय/पदव्युत्तर अधिविभागामध्ये भरण्याची अंतिम तारीख दि. 07.12.2021 अशी होती. तदनंतर उपरोक्त संदर्भ कं. 2 नुसार दि. 14.12.2021 पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

तथापि, राज्यामध्ये एस. टी. कर्मचा–यांनी पुकारलेल्या संपामुळे काही विद्यार्थी अद्याप परीक्षा अर्ज भरू शकलेले नाहीत. परीक्षेपासून कोणताही विद्यार्थी वंचित राहू नये म्हणून विद्यार्थी हितास्तव पारंपारिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकरीता परीक्षा अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात येत आहे.

विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरण्याबाबत व महाविद्यालयाने परीक्षा याद्या सादर करण्याबाबत खालीलप्रमाणे सुधारित तारखा प्रसिध्द करण्यात येत आहेत.

| विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात अथवा पद्व्यूत्तर अधिविभागामध्ये परीक्षा अर्ज भरावयाच्या **सुधारित तारखा** | महाविद्यालय अथवा पदव्युत्तर अधिविभागाने परीक्षा अर्ज online (Approve) करण्याच्या **सुधारित तारखा** | महाविद्यालयांनी विद्यापीठामध्ये परीक्षा अर्जाच्या यादया सादर करावयाच्या **सुधारित तारखा** |
|---|---|---|
| विनाविलंब शुल्क | विनाविलंब शुल्क | विनाविलंब शुल्क |
| **दि. २३.१२.२०२१ अखेर** | **दि.२४.१२.२०२१ अखेर** | **दि.२७.१२.२०२१** |

सबब, सर्व पारंपारिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थांकरीता परीक्षा अर्ज भरण्याच्या सुधारित तारखा व परीक्षा शुल्क सवलतीबाबतचे सदरचे परिपत्रक सर्व संबंधीत विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी यांच्या निदर्शनास आणावे.

गजानन पळसे
प्र. संचालक
(परीक्षा व मूल्यमापन मंडळ)

जा. क्र. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/ 759
दि. 17 DEC 2021

प्रत– माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी
1. मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था/अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2. सर्व उपकुलसचिव/सहा.कुलसचिव/समन्वयक– परीक्षा विभाग
3. आयटी कक्ष – संबंधीत अभ्यासक्रमाच्या परीक्षेकरीता संगणक प्रणालीतून योग्य ती सुविधा उपलब्ध करून दयावी.
4. परीक्षा विभागातील सर्व संबधित विभाग व अधिकारी – पुढील कार्यवाहीसाठी
5. दूरशिक्षण केंद्र
6. समन्वयक, इंटरनेट कक्ष – संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता
7. जनसंपर्क अधिकारी – प्रसिध्दीकरीता

D/December2020/Letter